# एका मनोऱ्यावर दोघे (Two on a Tower): थॉमस हार्डी

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

चार्ल्स डिकन्सनंतर १९ व्या शतकातील प्रसिद्ध कादंबरीकार थॉमस हार्डी. महाविद्यालयीन FY ते TY शिक्षणक्रमात Mayor of Casterbridge, Far from the Madding Crowd, Two on a Tower, Return of the Native, यापैकी एकही कादंबरी अभ्यासिलेली नाही असा माझा समकालीन विद्यार्थी दुर्मिळ. ग्रामीण पार्श्वभूमी व दैवामुळे शोकांतिक ही त्याच्या सर्व कादंबऱ्यांची दोन वैशिष्ट्ये म्हणता येतील. त्याच्या कथानकात खलनायक ही कुणी व्यक्ती नसते. नशीबच खलनायकाची भूमिका करते. कथेचा शेवट सुखांतिक होतो आहे असे वाटत असतानाच अचानक काहीतरी घडते व शेवट दुःखात होतो. हार्डीची लेखनशैली कमालीची उत्कंठावर्धक व शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी आहे. एका मनोऱ्यावर दोघे ही सर्व वैशिष्ट्ये दाखवणारी त्याची पहिली कादंबरी आहे.

**प्रमुख पात्रे:**

| | |
|---|---|
| १) स्विदिनः | ग्रहताऱ्यांचा अभ्यास करणारा २१ वर्षांचा एक देखणा तरूण |
| २) व्हिवियट लेडी कॉन्स्टंटाईनः | सरदारपत्नी, २९ वर्षांची सुंदर स्त्री |
| ३) लुई ग्रॅनव्हिलः | व्हिवियटचा शहरात राहणारा भाऊ |
| ४) बिशपः | स्विदिनचा मित्र |

**कथानक:**

वेलॅंड हाऊस या हवेलीचे मालक सरदार सर ब्लाऊंट इंग्लंड सोडून आफ्रिकेत शिकारीला गेल्याला २ वर्षाहून अधिक काळ लोटतो. त्यांचा काहीच ठावठिकाणा त्यांच्या पत्नीला व्हिवियटला नसतो. सर ब्लाऊंट ही एक विचित्र स्वभावाची, कमालीची संशयी व्यक्ती असते. जाताना त्यांनी आपल्या पत्नीकडून 'कुठल्याही पार्टीला हजर राहाणार नाही, समारंभात मिसळणार नाही, कुणालाही भेटणार नाही' असे वचन घेतलेले असते. जोगीणीसारख्या जीवन जगण्याच्या शपथेमुळे व्हिवियटचे जगणे नीरस, कंटाळवाणे झालेले असते. सर ब्लाऊंटकडून तिला त्या मुदतीत पत्रही नसते व काही बातमीही नसते.

त्यांच्या हवेलीपासून दोन मैलांच्या अंतरावर एका टेकडीवर एक जुना, पडका मनोरा असतो. कित्येक दिवसांत तिकडे कोणीही फिरकलेले नसते. एके दिवशी सहज उत्सुकतेने ती तिकडे वळते. मनोऱ्यावर पाऊल टाकताच एक अनपेक्षित गोष्ट तिला दिसते. एक तरूण दुर्बिणीतून आकाशाकडे पाहात असतो. तो अतिशय देखणा, कोवळ्या वयाचा, २१-२२ वर्षे वयाचा तरूण असतो. तो असतो स्विदिन सेंट क्लीव्ह - एका धर्मोपदेशकाचा व शेतकरी स्त्रीचा मुलगा. त्याचे आई वडील निधन पावलेले असतात व तो आपल्या आजीजवळ रहात असतो. आजोबा मनोऱ्याचे रक्षक असल्यामुळे त्यांच्यानंतर मनोऱ्याची किल्ली त्याच्याजवळ आलेली असते. त्याला खगोलशास्त्राची

खूप आवड असल्याने त्याने मनोऱ्यावर आपली छोटीशी वेधशाळा उभारलेली असते. या पहिल्या भेटीत तो तिला आपल्या दुर्बिणीतून ग्रहतारे दाखवतो व खगोलशास्त्रात शोध लावण्याची आपली महत्त्वाकांक्षा तिला सांगतो. त्याच्या तारूण्यसुलभ देखणेपणावर व लोभस स्वभावावर ती फिदा होते.

दुसऱ्या भेटीत ती त्याला आपले काम सांगते. तिला आलेल्या एका पत्रात सर ब्लाऊंट लंडनमधे असून वेषांतर करून राहात आहेत असे तिला कळवलेले असते. लंडनला जाऊन या बातमीचे खरेखोटेपण तपासून यावे ही कामगिरी ती त्याच्यावर सोपवते. तो सोपवलेले काम करून परत येतो. ती बातमी खोटी असते. त्याच्या गैरहजेरीत तिने आकाशाचे निरीक्षण करून नोंद केलेली असते. स्विदिनची दुर्बिण त्याने स्वतःच बनवलेली, फारशी शक्तिशाली नसलेली अशी असते. लंडनहून त्याने एक मोठे भिंग (लेन्स) दुर्बिणीला लावण्यासाठी आणलेले असते. गडबडीत त्याचे पार्सल खाली पडते व भिंग फुटते. त्याचे स्वप्न भंग पावते. निराश झालेला स्विदिन चिडून आदळआपट करतो, कमालीचा खिन्न होतो. ती त्याची समजूत काढते व त्याच्यासाठी दुसऱ्या लेन्सची मागणी नोंदवते. थोड्या दिवसात ती लेन्स येते. पण ती त्याच्या दुर्बिणीला बरोबर फिट होत नाही. चांगल्या दुर्बिणीचे त्याचे स्वप्न प्रत्यक्षात येत नाही. त्याची निराशा तिला बघवत नाही. ती त्याच्यासाठी चांगल्या मेकची शक्तिशाली दुर्बिणच मागवते. ती येते आणि स्विदिन खूष होतो.

हा सारा खर्च ती खगोलशास्त्रातील तिच्या आवडीमुळे करत असावी असे त्याला वाटते. पण प्रत्यक्षात ती त्याच्या प्रेमाखातर हे सर्व करत असते. स्विदिन खगोलशास्त्रातील एक अंदाज सिद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. नव्या दुर्बिणीमुळे तो लवकर सिद्ध होतो. हा त्याचा शोध नावीन्यपूर्ण ठरणार असतो. आपल्या शोधाचे सर्व पुरावे व निरीक्षणे तो सर्व नामवंत शास्त्रज्ञांना पाठवतो. काही मैलांवर असलेल्या पोस्ट ऑफीसमधे ते सर्व लिफाफे रवाना केल्यावर तो परत यावयास निघतो. वाटेत तो एक विज्ञानाचे मासिक वाचत येत असताना त्याच्या असे वाचण्यात येते की त्याने लावलेला शोध दुसऱ्या एका स्कॉलरने ६ आठवड्यापूर्वीच प्रसिद्ध केलेला असतो. नशीबाच्या या क्रूर चेष्टेने तो निराश होतो. नवीन संशोधन करून कीर्ती मिळवण्याचे त्याचे मनसुबे धुळीत मिळतात. मनस्तापाने तो पायवाटेवर स्वतःला लोटून घेतो व तसाच शोक करत पडून राहतो. अंधार दाटत जातो व पावसाच्या जोरदार सरी त्याला चिंब करतात. थंडगार पाऊस कित्येक तास त्याला भिजवत राहतो. पहाटेच्या सुमारास तापाने फणफणत बेशुद्ध झालेल्या स्विदिनला शेतकरी त्याच्या झोपडीवर पोचवतात.

त्याच्या कीर्तीच्या घंटेची आतुरतेने वाट पाहात असलेल्या लेडी व्हिवियटला त्याच्या आसन्नमरण अवस्थेची वार्ता १० दिवसांनी कळते. धावतपळत ती त्याच्या झोपडीवर पोचते. त्याची अवस्था पाहून विमनस्क झालेली व्हिवियट त्याला आवेगाने मिठी मारते व त्याचे दीर्घ चुंबन घेते. त्या चुंबनामुळे नव्हे तर आकाशात दिसू लागलेल्या नव्या धूमकेतूच्या बातमीने स्विदिन आजारातून लवकर बरा होतो. आणि लगेचच दुर्बिणीतून धूमकेतूचे निरीक्षण करण्यासाठी तो मनोऱ्यावर चढतो.

याच सुमारास एका पत्राने बातमी येते की सर ब्लाऊंट यांचा आफ्रिकेच्या जंगलात मृत्यू झालेला असतो. एकीकडे या बातमीने व्हिवियटला आनंद होतो. पण दुसरीकडे सर ब्लाऊंटच्या कर्जफेडीमुळे व निधनकरामुळे तिला बरीचशी मालमत्ता विकावी लागते व तिच्यावर आर्थिक संकट ओढवते.

एकदा रात्री व्हिवियट धूमकेतू दुर्बीणीतून पाहण्यासाठी मनोऱ्यावर येते. थोड्या वेळाने काही गावकरी दुर्बिणीतून धूमकेतू पाहण्यासाठी मनोऱ्याच्या दिशेने येताना दिसतात. बदनामीच्या भीतीने स्विदिन खाली जाऊन मनोऱ्याचे दार बंद करतो व थोडा वेळ तिथेच थांबतो. लोक परत जाण्याऐवजी थोडा वेळ तिथेच गप्पा मारत थांबतात. त्यांचा एक उद्‌गार - "लेडी साहेबांचे स्विदिनवर प्रेम आहे. त्याने त्यांच्याशी आता लग्न करावयास हरकत नाही." - त्याला व्हिवियटच्या त्याच्यावरील प्रेमाची व आजारपणात तिने घेतलेल्या चुंबनाची आठवण करून देतो. त्याक्षणी स्विदिनमधला प्रियकर जागा होतो. दडलेल्या भावनेची जाणीव झाल्यामुळे स्विदिनला काम करणे अशक्य झाले. एके दिवशी व्हिवियटजवळ त्याने आपले प्रेम व्यक्त केले व लग्नाची इच्छा व्यक्त केली. तिच्या प्रौढ वयामुळे - २९ वर्षे - ती सुरूवातीस त्याचे मन वळवायचा प्रयत्न करते. पण त्याच्या हट्टामुळे गुप्तपणे लग्न करण्यास संमती देते.

याच सुमारास व्हिवियटचा भाऊ लुई ग्रॅनव्हील याचे तिला पत्र येते की आता तिने एखाद्या श्रीमंत उच्चपदस्थ माणसाशी लग्न करावे. थोड्याच दिवसात तो तिला भेटावयास येणार असतो. नजीकच्या बाथ शहरात स्विदिन व व्हिवियट गुप्तपणे लग्न करतात. तीन दिवस स्विदिनच्या झोपडीत मधुचंद्र साजरा करून व्हिवियट हवेलीवर परत येते. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी त्याला एका अज्ञात चुलत आजोबाचे पत्र येते, त्यात त्यांनी स्विदिनला त्याच्या अभ्यासासाठी वर्षाला ६०० पौंड देऊ केलेले असतात. २१ वर्षे पूर्ण झाल्यापासून त्याला ते तहहयात मिळणार असतात. मात्र त्यात त्याने २५ वर्षे होईपर्यंत लग्न करता कामा नये अशी अट घातलेली असते. कपाळाला हात लावून तो ते पत्र टेबलाच्या ड्रॉवरमधे टाकतो व विसरून जातो.

एके दिवशी स्विदिनचा मित्र बिशप स्विदिनच्या अभ्यासाची चौकशी करावयास येतो. त्याला बेडवर सोन्याची बांगडी पाहून शंका येते व तो स्विदिनची कानउघाडणी करतो. याच वेळी लुई ग्रॅनव्हिल बाहेर उभा असतो. त्याच्या कानावर हे संभाषण पडते. दुसऱ्या दिवशी व्हिवियट आपली बांगडी शोधत असते. त्यावरून लुईला स्विदिन व व्हिवियटच्या संबंधाची शंका येते. बिशप पूर्वीपासूनच व्हिवियटकडे आकर्षित झालेला असतो. सर ब्लाऊंटच्या मृत्यूची बातमी कळताच तो तिला पत्र पाठवून आपले प्रेम व्यक्त करतो व तिला लग्नाची मागणी घालतो.

याच वेळी सर ब्लाऊंटचा सॉलिसिटर व्हिवियटला कळवतो की सर ब्लाऊंटचा मृत्यू आधी कळवल्यापेक्षा बऱ्याच नंतर झालेला असतो. याचा परिणाम म्हणजे व्हिवियट व स्विदिन यांचे लग्न ख्रिश्चन कायद्यानुसार रद्द झालेले असते. व्हिवियट परत लग्न करण्याचा आग्रह स्विदिनजवळ धरते. पण त्याच वेळी त्याच्या गैरहजेरीत त्याच्या आजोबांचे पत्र तिच्या हाती लागते व तिचा विचार

बदलतो. आता त्याने केप ऑफ गुड होप - आफ्रिकेचे दक्षिण टोक येथील वेधशाळेत जाऊन तेथे संशोधन करावे. दर वर्षी मिळणाऱ्या ६०० पौंड शिष्यवृत्तीचा उपयोग करावा. लग्न आल्यानंतर करता येईल.

तिच्या आग्रहामुळे नाराजीनेच स्विदिन केपला जातो. तो गेल्यानंतर काही दिवसातच व्हिवियटच्या लक्षात येते की तिला स्विदिनपासून दिवस गेलेले असतात. ती गर्भवती असते. ती स्विदिनला पत्र पाठवते. पण बदललेल्या पत्त्यामुळे ते त्याला मिळत नाही. लुईला हे कळताच तो तिला बिशपशी लग्न करायला भाग पाडतो. तिच्या लग्नाची व पुत्रजन्माची वार्ता स्विदिनला वृत्तपत्रातून कळते. तो दुःखी होतो व स्वतःला संशोधनात बुडवून घेतो.

५ वर्षे लोटतात. या दरम्यान बिशपच्या मृत्यूची व व्हिवियट वेलँड हाऊसला परत आल्याची बातमी स्विदिनला कळलेली असते. त्याचे संशोधनाचे कार्य संपलेले असते. एक प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ म्हणून तो घरी परत येतो. दुसऱ्या दिवशी हवेलीकडे जायच्या दिशेने तो बाहेर पडतो. त्याला मनोऱ्यावर कुणीतरी आहे असे दिसते. त्याची पावले त्या दिशेला वळतात व मनोऱ्यावर दोघे एकमेकासमोर येतात. दरम्यानच्या काळात व्हिवियटचे सौंदर्य व तारूण्य ओसरलेले असते. त्याच्या चेहऱ्यावरील अपेक्षाभंगाचा धक्का तिला जाणवतो. व्हिवियट विषण्ण मनाने परत जायला वळते. जड अंतःकरणाने ती त्याचा निरोप घेते. क्षणभर तोही काय करावे हे न समजून दुर्बिणीकडे वळतो. पण लगेचच आपण काय करायला पाहिजे हे त्याच्या लक्षात येते. तो पुढे होऊन तिला मिठीत घेतो आणि म्हणतो 'नाही व्हिवियट थांब, मी तुझ्यासाठी परत आलो आहे. मी तुझ्याशी लग्न करणार आहे.' आनंदाची एक अस्फुट हाक तिच्या मुखातून बाहेर पडते आणि ती त्याच्या बाहुपाशातच कोसळते. अनपेक्षित आनंदाचा धक्का सहन न झाल्याने त्याच्या बाहुपाशातच तिचे प्राणोत्क्रमण होते. कथानकाने घेतलेल्या वळणांना व सुखांत शेवटाचा एकदम शोकांत व्हावा यांना जबाबदार कोण? नशीब, दैवदुर्विलास!

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः

Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com